
# १८. कुटुंब आणि शेजारात होत असलेले बदल



सन १९५०



सन १९७०



सन १९९०



आज

## करून पहा

आईवडील आणि आजी-आजोबांना विचारून तुमच्या कुटुंबाविषयी खालील माहिती मिळवा.

- वर दिलेल्या वर्षी तुमच्या कुटुंबात किती माणसे होती ?
- कुटुंबातील माणसांच्या संख्येत बदल झाला का ?
- हा बदल कशामुळे होत गेला ?

कुटुंबातील माणसांची संख्या वेगवेगळी असू शकते. ही संख्या कायम तशीच राहत नाही. ती कमी-अधिक होत असते. कुटुंबातील सदस्यांच्या लग्नामुळे कुटुंबाच्या सदस्यांच्या संख्येत वाढ किंवा घट होते. लग्नानंतर काकू किंवा वहिनी आपल्या घरी आल्याचे आणि आत्या किंवा ताई दुसऱ्या घरी गेल्याचे तुम्ही पाहिले असेल. जन्म किंवा मृत्यूमुळेही कुटुंबातील सदस्यांच्या संख्येत बदल होतो. नवी पिढी जन्माला येते. त्याबरोबर कुटुंबाची वाढ होते. म्हातारपण, आजार, अपघात यांसारख्या कारणांमुळे कुटुंबातील सदस्य दगावतात. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी होते.

काही वेळा शिक्षणासाठी मुले-मुली दुसऱ्या ठिकाणी जातात. तसेच कामधंदा नोकरी-व्यवसायानिमित्त घरातील माणसे दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहू लागतात. अशा प्रकारे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहण्याला 'स्थलांतर करणे' असे म्हणतात. विवाह, जन्म-मृत्यू आणि स्थलांतर यांमुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी-अधिक होत राहते.

अशा प्रकारचे बदल फक्त आपल्याच कुटुंबात होतात असे नाही. असे बदल संपूर्ण समाजातही होत असतात.

## माहीत आहे का तुम्हांला



**पक्षीसुद्‌धा स्थलांतर करतात.**

अन्न आणि निवाऱ्यासाठी अनेक पक्षी स्थलांतर करतात. आकाशात इंग्रजी व्ही (V) अक्षरासारखा आकार करून उडणाऱ्या हंसांचा थवा तुम्ही पाहिला आहे का ? अत्यंत सुंदर दिसणाऱ्या रोहित पक्ष्यांविषयी तुम्ही ऐकले आहे का ? हे पक्षी दरवर्षी ठरावीक वेळी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. काही पक्षी दूरवर उडत जातात, तर काही जवळच्याच ठिकाणी जाऊन राहतात. ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांच्या दरम्यान रोहित पक्षी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. पक्षी थव्याथव्याने उडतात. ते एकमेकांच्या सोबतीने एकत्र राहत असले, तरी त्यांना काही माणसासारखे कुटुंब नसते किंवा माणसासारखा शेजारही नसतो !

## सांगा पाहू

शेजारी दिलेली तिकिटांची चित्रे पहा.

- समाजात झालेले कोणते बदल तिकिटांवरच्या चित्रांतून दिसत आहेत ?

कुटुंबातील माणूस काही कारणाने घरापासून दूर गेला की पत्राने, दूरध्वनीद्‌वारे आणि आता इंटरनेटद्‌वारे संपर्कात राहतो. या आधुनिक संपर्क माध्यमांमुळे जग जवळ आले आहे.



जुन्या काळापासून आतापर्यंत कुटुंबाच्या स्वरूपात खूप बदल झाले आहेत. शेतीतून स्वतःची उपजीविका करणारा माणूस हा एका जागी स्थिरावला होता. शेतीच्या कामासाठी खूप माणसे लागत. त्यामुळे नात्यागोत्यातील अनेकजण एकत्र राहत. या सगळ्यांचे मिळून मोठे कुटुंब बनत असे.

कुटुंबातील माणसांची संख्या जशी वाढली तसतसे फक्त शेती करून कुटुंबातील सर्वांचे पोट भरेनासे झाले. व्यापार आणि नवनवीन उद्योगधंदे यांचा विकास होत गेला. शहरे वाढू लागली. पोटापाण्यासाठी माणूस जिथे कामधंदा मिळेल तिथे जाऊन राहू लागला. मोठी कुटुंबे विखुरली गेली. त्यामुळे कुटुंबे छोटी झाली.

गेल्या काही वर्षांत शिक्षण आणि नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने दुसऱ्या राज्यात आणि परदेशात जाण्याचे प्रमाणही खूप वाढले आहे. काही वेळा कुटुंबातील एखादी व्यक्ती परदेशात असते, तर एखादी व्यक्ती आपल्याच देशातील दुसऱ्या शहरात असते. त्यामुळे कुटुंबही बदलत आहे.

**अशा बदलणाऱ्या कुटुंबाप्रमाणेच शेजारही बदलत जातो.**

### करून पहा

तुमच्या शेजारी राहणाऱ्या कोणत्याही तीन कुटुंबांची खालील माहिती गोळा करा.

- त्यांचे मूळ गाव कोणते ?
- त्या गावातून आत्ताच्या ठिकाणी त्यांचे कुटुंब कधी आणि कसे आले ?
- येथे त्यांनी कोणकोणते बदल पाहिले ?

कामधंदा, नोकरी-व्यवसायानिमित्त किंवा शिक्षणासाठी माणूस स्थलांतर करतो. स्थलांतरामुळे आपल्याला आपल्या देशातील विविधतेचे दर्शन होते. वेगळे सणवार, वेगळे खाद्यपदार्थ, वेगळ्या चालीरीती यांच्याशी ओळख होते. तरीही सारी माणसे माणूस म्हणून एकच आहेत हेही कळते.

### माहीत आहे का तुम्हांला

कामधंदा-रोजगारासाठी काहीजणांना वारंवार स्थलांतर करावे लागते. ऊसतोडणी करणारे कामगार किंवा बांधकाम करणारे कामगार असे अनेकजण जिथे काम मिळेल तिथे स्थलांतर करतात. अशा वारंवार स्थलांतर कराव्या लागणाऱ्या पालकांच्या मुलामुलींना परिसरातील शाळेत प्रवेश दिला जातो.

## सांगा पाहू










- या चित्रांत तुम्हांला काय दिसते ?
- तुम्ही आणि तुमच्या शेजाऱ्यांमध्ये कोणत्या गोष्टींची देवाणघेवाण होते ?

कुटुंबाव्यतिरिक्त आपला रोजचा संबंध आपल्या शेजाऱ्यांबरोबर येतो. आपण एकाच परिसरात राहतो. परिसरातील कचरा, सुरक्षितता, पाणी, वीज यांसारखे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला एकमेकांची मदत लागते. वेळप्रसंगी आपले नातेवाईक आपल्या मदतीला येईपर्यंत शेजारीच मदतीला येतात.

एकमेकांना केलेल्या मदतीमुळे आपले शेजाऱ्यांबरोबरचे संबंध सलोख्याचे होतात. सलोखा आणि मैत्रीपूर्ण संबंध यांमुळे आपले समूहजीवन आनंददायी होते.



## आपण काय शिकलो

- कुटुंबातील सदस्यांची संख्या एकसारखी राहत नाही.
- विवाह, जन्म-मृत्यू आणि स्थलांतर यांमुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी-अधिक होत राहते.
- स्थलांतरामुळे देशातील विविधतेशी ओळख होते. सणवार, खाद्यपदार्थ, चालीरीती यांच्यातील वेगळेपणा पाहायला मिळतो.
- आपल्या कुटुंबात जसे बदल होतात, तसेच शेजारपाजारच्या कुटुंबांतही बदल होत असतात.
- एकमेकांना केलेल्या मदतीमुळे आपले शेजाऱ्यांबरोबरचे संबंध सलोख्याचे होतात. सलोखा आणि मैत्रीपूर्ण संबंध यांमुळे आपले समूहजीवन आनंददायी होते.



## स्वाध्याय

### (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहण्याला..........म्हणतात.
२. स्थलांतरामुळे आपल्याला आपल्या देशातील ............. दर्शन होते.

### (आ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. शेती करून कुटुंबातील सर्वांचे पोट भरेनासे का झाले ?
२. माणूस स्थलांतर का करतो ?

### (इ) कारणे द्या.

१. मोठी कुटुंबे विखुरली गेली.
२. शेजाऱ्यांबरोबरचे संबंध सलोख्याचे होतात.

## उपक्रम

- शेजारच्या पाच कुटुंबांची माहिती मिळवा.
- 'माझा शेजार' या विषयावर दहा ओळी निबंध लिहा.
- पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह करा.

* * *

5EFP6L